REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 10 | ISSUE - 9 | JUNE - 2021

# ऑनलाईन शिक्षणाबद्दलच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे

प्रा.डॉ. तानाजी आबा चंदनशिवे
सहा. प्राध्यापक माऊली शिक्षणशास्त्र महाविद्यालय वडाळा ता. उ.सोलापूर.

## प्रस्तावना :



आजच्या परिस्थितीमध्ये जगावर कोरोना रोगाच्या महामारीच मोठे संकट ओढावले आहे. यामुळे गेल्या दोनवर्षापासून शाळा महाविदयालयात प्रत्यक्ष शिक्षणापासुन मुलांना वंचितच रहावे लागत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा विचार करून व आरोग्याचा विचार करून ऑनलाईन शिक्षणपद्धती अवलंबली जात आहे. त्या आनलाईन शिक्षणपद्धती बाबतचा विदयार्थ्याचा दृष्टीकोन पहावासा वाटतो.

## संशोधनाची गरज –

आजच्या महामारीच्या काळात वाढत्या रोगाच्या भीतीने शाळा महाविद्यालयांनी विद्यार्थीचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्यास सुरवात केली. याकडे विद्यार्थी कोणत्या दृष्टीकोनातून पाहतात हे पाहण्यासाठी संशोधनाची गरज वाटली.

## संशोधनाची उद्दीष्टे:

1) ऑनलाईन शिक्षणाबाबतच्या विद्यार्थीच्या दृष्टीकोनाचा अभ्यास करणे
2) ऑनलाईन शिक्षणाच्या वस्तुस्थितीचा अभ्यास करणे

## संशोधनाचे महत्व :

1) सदर संशोधन हे ऑनलाईन शिक्षण देणाऱ्या संस्थेसाठी महत्वाचे आहे.
2) सदर संशोधन हे ऑनलाईन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महत्वाचे आहे.
3) सदर शिक्षण हे ऑनलाईन शिक्षण देणाऱ्या शिक्षकांसाठी महत्वाचे आहे

## संशोधनाची व्याप्ती

1) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविदयालयाशी संबधीत आहे
2) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविदयालयातील विद्यार्थ्यांशी संबधीत आहे
3) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविदयालयातोल ऑनलाईन शिक्षणाबद्दलच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनाशी संबधीत आहे

## संशोधनाची मर्यादा

1) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालय वडाळा पूरते मर्यादित आहे.
2) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातोल विद्यार्थ्यांपूरतेच मर्यादित आहे
3) सदर संशोधन हे शिक्षणशास्त्र महाविद्यालयातोल ऑनलाईन शिक्षणाबद्दलच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनापूरतेच मर्यादित आहे

## संशोधनाची नमूना निवडः

शिक्षणशास्त्र महाविद्यालयातोल 100% विद्याथ्याची म्हणजेच 100% नमूना निवड करण्यात आली

## संशोधनाची साधनेः

विद्यार्थी, मतावली, प्रश्नावली

## संशोधन कार्यपद्धत :

सदर संशोधन वर्तमानकाळाशी म्हणजेच चालू परिस्थीतीशी निगडीत असल्याने सदर संशोधनासाठी वर्णनात्मक पद्धतीची निवड करण्यात आली.

## निष्कर्ष :

1) 6०% विद्यार्थ्यांच्या मते ऑनलाईन शिक्षणामुळे वेळेची बचत होते.
2) 70% विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण पद्धती योग्य वाटते
3) 45 % विद्यार्थ्यांना वाटते तात्रीक बिघाडामुळे ऑनलाईन शिक्षणात अडथळा येतो.
4) 60 % विद्यार्थ्यांच्या मते शंकाच 100 % निरसन होईलच असे नाही
5) 50% विद्यार्थ्यांच्या मते ही पद्धती सर्वसमावेशक वाटत नाही

## संदर्भः

1) भिताडे वि.रा. (2008) शैक्षणिक संशोधन पद्धती,नूतन प्रकाशन पुणे.